वार्ताहर/ जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे

दैनिक विश्वजगतला संपूर्ण राज्यात जिल्हा/ तालुका/शहर व ग्रामस्तरावर वार्ताहर/ जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे. इच्छूकांनी त्वरित संपर्क साधावा

9096873185



दैनिक

# विश्वजगत

RNI No:- MAHMAR/2023/86213

https://epaper.dainikvishwajagat.in

मुख्य संपादक गजानन काटे : 9096873185

E-mail : dainikvishvjagato101@gmail.com



■ बुलडाणा ■ वाशिम ■ अकोला ■ अमरावती ■ यवतमाळ ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ परभणी ■ जालना ■ नाशिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ जळगाव खान्देश ■ धुळे ■ रायगड ■ ठाणे ■ पुणे ■ सातारा

गुरुवार दिनांक 11 सप्टेंबर 2025 वर्ष : 4 थे अंक : 121 वा पाने : 4 किंमत : 5 रुपये

## शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचाच आवाज घुमणार:दसरा मेळावा घेण्यास महापालिकेची परवानगी, मेळाव्यासाठी घातल्या 25 अटी

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची ओळख असलेल्या शिवाजी पार्क मैदानावर यंदाही उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मेळावा घेण्यासाठी परवानगी मिळाली आहे. मात्र, महानगरपालिकेने ही परवानगी देताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला 25 अटी घातल्या आहेत. या अटींची पूर्तता करण्याचे निर्देश महापालिकेने दिले आहेत.

शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवाजी पार्क हे दसरा मेळाव्याचे मुख्य केंद्र राहिले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केला होता. महापालिकेने तो अर्ज स्वीकारून ठाकरे गटाला दसरा मेळावा घेण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शिवाजी पार्कवर ठाकरेंचा 'आवाज' घुमणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिवसैनिक हे भाषण ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हा मेळावा होत असल्याने यातून उद्धव ठाकरे काय भूमिका मांडणार आणि शिवसैनिकांना काय मार्गदर्शन करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

शिवाजी पार्कसाठी शिंदे-ठाकरेंमध्ये रस्सीखेच

शिवसेनेच्या स्थापनेपासून दरवर्षी शिवाजी पार्कवर शिवसेनेचा दसरा मेळावा होतो. पण शिवसेनेच्या फुटीनंतर या ठिकाणी मेळावा घेण्यासाठी शिंदे गटानेही परवानगी मागितली होती. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून या मैदानावरील मेळाव्यासाठी दोन्ही गटांमध्ये रस्सीखेच होताना दिसते. यंदा मात्र यावर जास्त काही वाद न होता, हे मैदान उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मिळणार आहे. तर शिंदेंचा मेळावा हा आझाद मैदानावर होणार आहे.



मेळाव्यासाठी घातलेल्या अटी कोणत्या?

आपणांस मैदानाचा वापरासाठी रु. 250+ 18% (जीएसटी सीजीएसटी)। (प्रत्तिदिवशी रु. 250+18% (जीएसटी + सीजीएसटी) परवाना शुल्क भरावे लागेल.

आपणास Notice Of Motion No. 666 of 2015 अन्वये मा. न्यायालयाने घातलेल्या अटी व शर्तींचे पालन करावे लागेल.

आपणास शासन निर्णय क्र. बीएमसी -2515/प्र.क्र. 1270/ नवि-21 दि. 20.01.2016 मधील अटी व शर्तींचे पालन करावे लागेल.

## गेवराईच्या उपसरपंचाची आत्महत्या:प्रेम संबंधातून फसवणूक आणि धमक्यांचा आरोप



संजय कडोळे: दैनिक विश्वजगत

बीड : जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे (34) यांच्या आत्महत्येनंतर संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. कला केंद्रातील एका नर्तिकेच्या प्रेमात अडकलेल्या गोविंद यांनी तिच्या घरासमोर गाडीमध्ये स्वतःवर गोळी झाडून जीवन संपवले. या प्रकरणातील नर्तिका पूजा गायकवाडला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गोविंद बर्गे यांच्या आत्महत्येच्या घटनेनंतर पूजा गायकवाडचा एक इंस्टाग्राम व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये ती एका ऑडिओवर अभिनय करताना दिसत आहे, ज्यात 'मला या माणसाची विचित्र सवय लागली आहे, हा माझ्या आयुष्यातून गेला तर फार अवघड होईल' असे बोलले आहे. तिच्या एका हातात 500 रुपयांची नोट आणि चार बोटांमध्ये सोन्याच्या अंगठ्या दिसत आहेत. ही क्लिप आता या प्रकरणाच्या संदर्भात पाहिली जात आहे. ओळखीचा फायदा घेऊन प्रेमसंबध ठेऊन वेळोवेळी पैसे, सोने लुबाडले. दिलेल्या पैशातून मावशी व नातेवाईकांच्या नावावर प्लॉट जमीन घेतली. तरीही भावाच्या नावावर 5 एकर शेती करावी किंवा गेवराईतील नवीन घर माझ्या नावावर कर नाहीतर तुझ्यावर दुष्कर्माचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पैशासाठी नर्तिका पूजा देविदास गायकवाड (21, रा. सासुरे ता. बार्शी, जि. सोलापूर ) हिने वारंवार तगादा लावला. त्यामुळेच गोविंदने आत्महत्या केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली.



## मराठा समाजाला बोगस सर्टिफिकेट देता कामा नये:OBC उपसमिती बैठकीत पंकजा मुंडेंची भूमिका

प्रतिनिधी : दैनिक विश्वजगत

मुंबइ : मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या संदर्भातील 8 मागण्यांपैकी 6 मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. सरकारने हैदराबाद गॅझेट नुसार शासन निर्णय जारी करत मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात आले. यावर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करत आज त्याची बैठक देखील पार पडली. ही बैठक महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत मंत्री छगन भुजबळ आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच मंत्री पंकजा मुंडे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत म्हटले की, मराठा समाजाला बोगस सर्टिफिकेट दिले जाऊ नये यासाठी आम्ही ठाम भूमिका घेतलेली आहे. तर सरकारने काढलेल्या जीआरमधील मराठा शब्दावर आक्षेप घेत भुजबळ यांनी आपली भूमिका मांडली. मराठा समाजासाठी काढलेल्या जीआरमुळे ओबीसीला फटका बसतोय, असे भुजबळ यांनी स्पष्टपणे सांगितले.पंकजा मुंडे म्हणाल्या, बैठकीत आमची विस्तृत चर्चा झाली. त्यामध्ये, ओबीसी हिताच्या बाबतीत निर्णय झाले आहेत. जागृतपणे निर्णय होत आलेले आहेत, ओबीसींमध्ये अनेक जाती आहेत,

## एनएचएम कर्मचाऱ्यांचा संप 23 दिवसांनंतर मिटला:10 मागण्यांना तत्वत: मान्यता; एकत्रीकरण समितीच्या लढ्याला यश

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मुंबइ :राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या समवेत झालेल्या बैठकीनंतर आज अखेर मागे घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार याविषयी सकारात्मक असल्याचे सांगत आबिटकर यांनी संघटनेतील पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन १३ पैकी १० मागण्यांना तत्वतः मान्यता दिली. तसे लेखी पत्र राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या पदाधिकाऱ्यांना सुपूर्त केले. यामुळे गेल्या २३ दिवसांपासून सुरू असलेला बेमुदत संप अखेर मागे घेण्याचा निर्णय संघटनेने घेतला.

१४ मार्च २०२४ रोजी झालेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी १९ ऑगस्टपासून एनएचएमच्या राज्यभरातील सुमारे ३५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू होते. विविध मागण्यांसाठी आरोग्य



सेवेतील १६ संघटनांनी प्रथमच एकत्रित येऊन यात सहभाग घेतला होता. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी आज एकत्रीकरण संघटनेशी सविस्तर चर्चा करून यावर तोडगा काढला. यावेळी संघटनेचे राज्य समन्वयक विजय गायकवाड,दिलीप उटाणेॲड. भाग्यश्री रंगारी,डॉ दत्ता गायकवाड डॉ राम नागे हर्षल रणवरे डॉ प्रकाश मोरे स्वप्नील गोसावी श्रीधर पंडित,गौरव जोशी बबलु पठाण यांच्यासह इतर राज्य समन्वयक उपस्थित होते. तत्पूर्वी आयुक्त कादंबरी बलकवडे आणि सार्वजनिक आरोग्य सेवेचे संचालक नितीन अंबाडेकर यांच्यातही याविषयी सकारात्मक बैठक झाली.आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, समायोजन प्रक्रियेसह कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लागावे, अशी माझी कायमच आग्रही भूमिका होती. परंतु, हे प्रश्न सोडवताना भविष्यात त्यामध्ये कोणत्याही त्रुटी राहू नये, यासाठी मी प्रयत्नशील होतो.

सामान्य प्रशासक, ग्रामविकास, नगर विकास, वैद्यकीय शिक्षण यांच्या देखील मी सातत्याने संपर्कात होतो. सदर कार्यभार सांभाळणाऱ्या मंत्री महोदयांनी तसेच वरिष्ठांनी याविषयी अनुकूलता दर्शवली. मागण्यांची अंमलबजावणी करताना शासकीय पातळीवर सकारात्मकता असली तरी प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींची पडताळणी आणि पूर्तता करण्यासाठी आवश्यक तो वेळ द्यावा लागेल, असेही त्यांनी आवर्जुन सांगितले.उर्वरित ३ मागण्या समायोजनासंदर्भात असल्याने त्यातील तांत्रिक बाबींना लागणारा विलंब लक्षात घेता, त्यावरही लवकरच कार्यवाही केली जाईल, असे सांगून मंत्री आबिटकर यांनी संघटनेला आश्वासित केले. तसेच पुढील समन्वय व पाठपुराव्यासाठी संघटनेस समिती स्थापन करावी, अशी सूचनाही प्रकाश आबिटकर यांनी केली.

## राहेरा येथे भगवान बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाची सांगता समारोह संपन्न

प्रतिनिधी: दै.विश्वजगत

मोताळा - तालुक्यातील राहेरा येथे भाद्रपद पौर्णिमेचे औचित्य साधून भगवान बुद्ध त्यांच्या धम्म या पवित्र ग्रंथ पठणाचा सांगता समारोह करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे वाचन आषाढ पौर्णिमेपासून सुरू होते.संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी आहे बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे वाचन मोताळा तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये सुरु आहे . राहेरा येथील ग्रंथाची सांगता समारोह आज दि.७ सप्टेंबर २०२५ रोजी भाद्रपद पौर्णिमेच्या दिवशी करण्यात आली त्या वेळी राहेरा येथील सिद्धार्थ नवयुग मित्र मंडळ व रमाई महिला मंडळ यांच्या वतीने

तालुक्यातून आलेल्या सर्व कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्याची



शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व सर्वप्रथम तालुक्यातून आलेल्या सर्व मान्यवरांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेचे दीप व धूप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. त्रिशरण पंचशिलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. नंतर सोपान सावळे (संस्कार सचिव भा.बौ. महासभा) यांनी ग्रंथाच्या शेवटच्या पानांचे वाचन करून पौर्णिमेचे महत्व सांगितले.

त्यावेळी तालुक्यातील ज्येष्ठ नेते डी. टी. इंगळे हरी तायडे अशोक धुरंदर समाधान गायकवाड व भारतीय बौद्ध महासभेचे संगपाल अहिरे, श्रीकृष्ण सूरडकर, सोपान सावळे, सतीश गुरचवडे, सुनील सुरडकर, लाला गवई, नाना दाभाडे, उमेश सोनवणे, भाऊराव मेढे, अशोक वानखडे सर, सुभाष गायकवाड, गणेश हिवाडे ,पुंडलिक राहणे, दिपक गवई, मोरे सर सुरेश सुखदाणे मधुकर अवचार भगवान गरुडे अमोल गवई विजय दोडे(पत्रकार) कार्यक्रमाला उपस्थित होते

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला त्याकरता राहेरा गावातील ग्रंथवाचक प्रदीप शिरसाठ तथा सिद्धार्थ नवयुग मित्र मंडळ व रमाई महिला मित्र मंडळ यांनी परिश्रम घेतले

शेवटी शरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## समृद्धी महामार्गावर मोठ्या प्रमाणावर खिळे:प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण, पण प्रशासनाने आरोप फेटाळले

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मुंबइ : महाराष्ट्राच्या विकासाची भाग्यरेषा मानला जाणारा समृद्धी महामार्ग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अधूनमधून अपघातांच्या बातम्यांमुळे कायम वादग्रस्त ठरणाऱ्या या महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास एक धक्कादायक प्रकार घडला. नागपूरकडून मुंबईच्या दिशेने निघालेल्या अनेक वाहनांचे टायर अचानक पंक्चर झाले. गाड्या थांबवून तपासणी केल्यानंतर असे दिसून आले की ब्रिजवर मोठ्या प्रमाणावर विशिष्ट प्रकारचे खिळे ठोकलेले आहेत. ही बाब उघड होताच प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि महामार्गावर गोंधळ उडाला. दरम्यान, प्रशासनाने हे आरोप फेटाळून लावलेत. तसेच समृद्धी मार्गावर कुठल्याही प्रकारचा धोका नसल्याचे म्हटले आहे. नेमका काय प्रकार आहे, जाणून घ्या...

सुरुवातीला लोकांना वाटले की चोरट्यांनी हा डाव रचला असावा. वाहनांचे टायर पंक्चर करून लुटमारी करण्यासाठीच हे खिळे ठोकले असावेत, अशी चर्चा प्रवाशांमध्ये होती. मात्र नंतर प्रत्यक्ष परिस्थिती समोर आली आणि धक्कादायक बाब उघड झाली. रस्त्याचे काम करणाऱ्या कंपनीनेच हे खिळे ठोकले होते. महामार्गावरील दुरुस्तीच्या कामासाठी हे खिळे ठोकण्यात आले होते, परंतु नागरिकांना पूर्वसूचना न देणे, तसेच आवश्यक बॅरिगेटिंग न करणे ही गंभीर बेपर्वाई असल्याचे स्पष्ट झाले.

घटनेनंतर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर रस्त्याचं काम सुरू होतं, तर तेथील बॅरिगेटिंग का करण्यात आलं नाही? गाड्यांचे टायर पंक्चर झाल्यानंतर हे खिळे रात्रीतूनच काढून टाकण्यात आले, मग दिवसा हा प्रकार टाळता आला नसता का? गाड्या पंक्चर झाल्यामुळे प्रवाशांना रात्रीतून नाहक मनस्ताप सहन करावा लागला. त्याहून गंभीर बाब म्हणजे या खिळ्यांमुळे एखाद्या गाडीचा ताबा सुटून मोठा अपघात घडला असता, तर जबाबदार कोण ठरणार होता? या घटनेमुळे महामार्गाच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भातले व्हिडिओ शूट करून वाहनधारकांनी सोशल मीडियावर पोस्ट केले. त्यामुळे गोंधळाचा वातावरण निर्माण झाले. प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महामार्गावरून प्रवास करणारे सर्वसामान्य नागरिक आपले कराचे पैसे भरून सुरक्षित प्रवासाची अपेक्षा करतात. मात्र प्रशासन व कंत्राटदार कंपन्यांच्या निष्काळजीपणामुळे त्यांना अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांच्या गाड्या पंक्चर होऊन मोठे नुकसान झाले असून, काही वाहनधारकांना महामार्गावरच तासन्तास थांबावे लागले. या संदर्भात प्रशासनाने संबंधित कंपनीवर तातडीने कारवाई करावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर



पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दुसरीकडे, यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल होताच प्रशासनाने एका पत्रकाद्वारे याविषयी स्पष्टीकरण दिले आहे. 9 सप्टेंबर रोजी 11.00 वाजेपासून समृद्धी महामार्गावर, माळीवाडा इंटरचेंज छ. संभाजीनगर येथे (पोलिस स्टेशन दौलताबाद हद्दीतील) मेगा इंफ्रास्ट्रक्चर प्राइवेट लिमिटेड या कंपनीकडे समृद्धी महामार्गाच्या देखभालीचे काम असून पूर्ण बॅरिकेटिंग करून रस्त्याच्या भेगांसाठी इपॉक्सी ग्राउटिंग (Epoxy Grouting) हा काँक्रीट रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी भेगेमध्ये इंजेक्शनद्वारे मिश्रण भेगेमध्ये टाकण्यासाठी नोझल लावण्यात आलेले होते. सदर महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांनी बॅरिकेट उडवून काम सुरू असलेल्या रोड वरून गाडी घातल्या मुळे प्रवाशांच्यागाड्या पंक्चर झाल्या होत्या.दिनांक 9 सप्टेंबर रोजी रात्री 8 च्या सुमरास



गाडी पंक्चर झालेल्या प्रवाशांनी त्या वेळेत व्हिडिओ काढून चुकीचा मेसेज सोशल मीडियावरती प्रसारित केला.

सदर ठिकाणी चोरीचा कुठलाही प्रकार नाही तसेच कोणतीही हानी झाली नाही. MSRDC तर्फे देखभालीचे काम सुरू आहे. याबाबत महामार्ग पोलिस व स्थानिक पोलिसांच्या वतीने जनजागृती करण्यात येत आहे. सदर महामार्ग देखभालीचे काम पूर्ण झाल्याने सदर खिळे आज 109 सप्टेंबर रोजी काढण्यात आलेत. सध्या वाहतूक सुरळीत सुरु आहे.

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १३० वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते.

तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले.

पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली.

भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी /देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते.

१९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## माणसाला संगत चांगलीच असावी !



सुसंस्कृत लोकांची संगत आणि यशस्वी लोकांचे मार्गदर्शन आपल्या जीवनात बदल नक्की घडवू शकते. लहानपणी हातात गच्च पकडलेली पाच रुपयाची नोट आणि तोंडातून अखंड जप... दोन रुपयाचे फुटाणे, एक रुपयाच्या खोबर गोळ्या आणि बाकी पैसे परत... असा एका हातात चड्डी धरून पळत पळत केलेल्या बाजाराची सर आजच्या मॉल मधल्या शॉपिंगला कधीच येत नाही..!!भिक्षा पात्र तो भरा जा सकता है लेकिन इच्छा पात्र कभी भरा नही जा सकता..संतोष में ही परम सुख है.!!शायद मै इसलिये पीछे हुं कारण मुझे होशियारी नही आती... बेशक लोग ना समजे मेरी वफादारी,.. मगर मुझे गद्दारी नही आती.!! संघर्ष जितका कठोर असतो तितकाच विजय गौरव पूर्ण असतो. वर्गात शिक्षक विचारतात.. गाव आणि शहर यामध्ये फरक काय आहे? एका मुलाने खूप छान उत्तर दिले... सर गावात गाई पाळल्या जातात आणि कुत्री मोकाट भटकत फिरतात... आणि शहरात कुत्री पाळली जातात आणि गाई भटकत फिरत असतात.. जीवनाचे कटू सत्य आहे सर.. अनाथाश्रमात मुलं भेटतात गरिबाची आणि वृद्धाश्रमात मायबाप भेटतात श्रीमंताची..!! विचार करायला लावणारी गोष्ट आहे सर..!! टेन्शन, डिप्रेशन और बेचैन मनुष्य तभी होता है जब वह खुद के लिए कम दुसरौं के लिए ज्यादा सोचता है.!! आयुष्य म्हणजे बाकी काही नाही तर वादळात सापडलेली नाव... आणि हार न मानत किनाऱ्याकडे केलेली धाव... म्हणजे आयुष्य.!!एक ते बालपण होतं जेव्हा जादूवर पण विश्वास होता.. आणि आज परिस्थिती अशी आहे की वास्तविकता सुद्धा खरी वाटत नाही.दुःख तब होता है जब आपको एहसास हो की जिसे आप महत्व दे रहे है उसकी नजर मे आपका कोई महत्व नही है..

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40

## नारायणराव नागरे महाविद्यालयात अंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा (मुली) आयोजन

**अनिल दराडे : दै.विश्वजगत**

सिंदखेडराजा - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रुम्हणा द्वारा संचलित नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड तालुका सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा येथे आयोजित आंतर महाविद्यालय विद्यापीठ स्तरीय कबड्डी स्पर्धा (मुली) यांचे आयोजन मा . डॉ . मिलिंद बारहाते (कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले . दिनांक 10 सप्टेंबर 2025 ते 13 सप्टेंबर 2025 या कालावधीत नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड येथे आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . सिंदखेडराजा अनिल दराडे दिनांक 10 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 11:30 वाजता विद्यापीठ स्तरीय कबड्डी स्पर्धा (मुली) यांचा उद्घाटन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. तोतारामजी कायदे साहेब (माजी आमदार तथा अध्यक्ष भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रुम्हणा) हे होते . उद्घाटक म्हणून मा. प्रा. संजय खडसे साहेब उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा हे उपस्थित होते यांच्या हस्ते आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजय नागरे सर अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तसेच प्राचार्य नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड यांनी केले . या कार्यक्रमासाठी मा .डॉ .खरात साहेब मा . शिवराज भाऊ कायंदे (सचिव भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा) माननीय प्रभाकररावजी ताठे साहेब प्रा . जी .एस . देशमुख सर पत्रकार मा . बाजीरावजी वाघ साहेब पत्रकार संजयजी नागरे साहेब पत्रकार भोसले साहेब पत्रकार कोंढाणे साहेब प्राध्यापिका सौ धनश्री ताई कायंदे (संचालिका भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा) प्राध्यापिका ठोके मॅडम प्रा. डाबरे सर प्रा . अभय सर प्रा . कोळी सर प्राध्यापिका रिंढे मॅडम प्राध्यापिका डामले मॅडम प्राध्यापिका डॉ . संगीता खडसे मॅडम प्रा . गवई सर यांचे प्रमुख उपस्थिती होती . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा . डॉ . दीपक देशमाने यांनी केले तसेच आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा - मुली या विद्यापीठ स्तरीय स्पर्धांचे आयोजन प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर यांनी केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष मान्य तोतारामजी कायंदे माजी आमदार तथा अध्यक्ष भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूमना यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रा . संजयजी खडसे साहेब उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांनी आंतर महाविद्यालय विद्यापीठ स्तरीय स्पर्धाचे उद्घाटन केले व संघातील खेळाडूंना स्पर्धा खेळण्यासाठी शुभेच्छा दिल्या प्राचार्य डॉक्टर विजय नागरे सर अधिसभा सदस्य तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी विद्यापीठ स्तरीय स्पर्धाच्या आयोजनाच्या मागचा उद्देश सांगितला तसेच सर्व संघांना खेळण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉक्टर विजय नागरे यांनी करताना महिला गट स्पर्धा आयोजना मागची भूमिका विशद करून मागील तीन वर्षापासून महाविद्यालय यजमानपद स्वीकारत आहे एकवेळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी ही यामागचे भावना असून याबाबतीत रिपोर्ट करा महाविद्यालय सतत अग्रेसर राहील तर उद्घाटक म्हणून बोलताना प्राध्यापक संजय खडसे म्हणाले की जीवनामध्ये खेळाला अतिशय महत्त्व असून याद्वारे नियमित खेळ खेळल्याने आरोग्य तंदुरुस्त राहण्यास मदत होते त्याचबरोबर कबड्डी सारख्या खेळामधून विद्यार्थ्यांना सांघिक भावना निर्माण होते . खेळाडूंनी खेळाडू वृत्तीने या स्पर्धेकडे बघितले पाहिजे त्यासाठी अपयशाने हुरळून जाऊ नये तर हरलो तरी पुन् - प्रयत्न करावे . असा सल्ला उपस्थित खेळाडूंना देऊन उद्घाटन झाल्याचे जाहीर करून शुभेच्छा दिल्या .तर अध्यक्षीय समारोपय भाषणात मान्य तोतारामजी कायंदे साहेबांनी आज ही बदलत्या जीवनशैलीच्या काळातही कबड्डी सारख्या मार्गाने खेळ खेळाडूंना ताणतणाव यापासून मुक्ती देण्यात संविधान करण्यात त्याग व तणावहित जीवन कसे जगावे हे या खेळामध्ये सहभागी होऊन बक्षीस किंवा पारितोषिक साठी आनंद मिळवण्यासाठी खेळा जीवन छान असून आनंदाने जगण्यासाठी एक माऊस व आनंद घेण्यासाठी खेळून विशेष मुलींच्या स्पर्धा असल्याने एक प्रकारे महिलांना निर्भय बनून आपला व्यक्तिमत्व विकास घडवून आणावा असा आशावाद व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या .





## श्री गणेशोत्सव प्रोत्साह समितीतर्फे श्री गणेश मंडळाचा सत्कार

**सौ उषाताई डोंगरे : दै.विश्वजगत**

देऊळगाव राजा - शहरातील श्री गणेशोत्सव प्रोत्साहन समितीतर्फे श्री गणेश विसर्जन मिरवणूक सोहळ्यामध्ये सहभागी 30 श्री गणेश मंडळाचा ग्रामदैव श्री बालाजी महाराजांची लाईटची फोटो प्रतिमा सन्मानपत्र शाल श्रीफळ टोपी पुष्पहार देऊन श्री गणेश मंडळाचा क्रांतीसुर्य महात्मा फुले चौक येथील छत्रपती गणेश मंडळाच्या मंचकावर सन्मान करण्यात आला

श्री गणेशोत्सव प्रोत्साहन समिती देऊळगाव राजा ही 1993 ला स्थापन झाली या समितीमध्ये शहरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेले सन्माननीय व्यक्तिमत्व एकत्रित येऊन सदर समितीच्या माध्यमातून श्री गणेश भक्तांना व श्री गणेश मंडळ यांना प्रोत्साहन देण्याचे काम करतात यामध्ये प्रशासनात कार्यरत असलेले विद्यमान अधिकारी व आमदार , माजी आमदार हे मानद सदस्य असतात श्री गणेश उत्सव प्रोत्साहन समिती २०१५ तर्फे श्री गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेले 30 गणेश मंडळ यांनी विविध देखावे व मंडळासमोरसादरीकरण केले या गणेश मंडळाचा ग्रामदैव श्री बालाजी महाराज यांची लाईटची फोटो प्रतिमा , सन्मानपत्र ,शाल , टोपी व श्री बालाजी संस्थांचे मानाचे श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला . माजी आमदार डॉ शशिकांत खेडेकर व नंदन खेडेकर यांच्याकडून रोख बक्षीस देण्यात आले

श्री गणेशोत्सव प्रोत्साहन समिती 2025 चे अध्यक्ष प्रीजे मोहन मल्लावत यांच्या अध्यक्षतेमधील समितीचे गठन झाले यावेळी येणाऱ्या श्री गणेश मंडळाचे स्वागत समितीतर्फे अध्यक्ष ब्रिजमोहन मलावत उपाध्यक्ष मंगेश तिडके व योगेश खांडेभराड मानत सदस्य माजी आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर आमदार मनोज कायदे यांचे प्रतिनिधी बंधू सतीश कायंदे नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी अरुण मोकळ पोलीस निरीक्षक ब्रह्मागिरी संघटक एडवोकेट घनश्याम बाला



वसंतप्पा खुळे, विनोद जयस्वाल गोविंदराव झोरे कैलास धन्नावत सचिव संचित धनावत कोषाध्यक्ष सुरज गुप्ता गणेश मंडळ संपर्कप्रमुख पवन बोराटे अरविंद खांडेभराड प्रसिद्धी विभाग प्रमुख सर्व पत्रकार संघ मानत सदस्य श्री बालाजी संस्थान राजे विजयसिंह जाधव आमदार मनोज कायंदे माजी मंत्री डॉक्टर राजेंद्र शिंगणे माजी आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर उपविभागीय अधिकारी प्राध्यापक खडसे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम तहसीलदार वैशाली डोंगरजाळ नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी अरुण मोकळ पोलीस निरीक्षक ब्रह्मगिरी



आदीसह कार्यकारणी सदस्यराजेश भुतडा डॉक्टर शंकर तलवे राजेश इंगळे संतोष खांडेभराड पवन जोरे प्रदीप वाहक मधुकर रायमुल बळीराम मापारी सतीश बारवकर नंदन खेडेकर गोपाळ व्यास ॲड विजय सुनगत ॲड रामेश्वर रामाने सुनील शेजुळकर सुजित गुंडे प्रभाकर खांडेभराड प्रवीण धन्नावत मल्हार वाजपे ॲड अर्पीत मिनासे राजू खांडेभराड निलेश अग्रवाल आशिष वैद्य अविनाश भावसार ,अनिकेत भाग्यवंत भीमराव चाटे सर्व पत्रकार संघाचे सदस्य आदी सदस्यासह समिती मधील 100 सदस्यांनी श्री गणेश मंडळांचा सत्कार व सन्मान केला .छत्रपती गणेश मंडळ यांनी महात्मा फुले चौकातील मंच सत्कारासाठी उपलब्ध करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज गुप्ता तर आभार अध्यक्ष ब्रिजमोहन मलावत यांनी व्यक्त केले

नगरपरिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी अरुण मोकळे यांच्या मार्गदर्शनामध्ये त्रिमूर्तीचे विसर्जन आमना नदीतील काठावरील पालिकेच्या विहिरीत करण्यात आले संपूर्ण विसर्जन मिरवणुकीमध्ये पोलीस बंदोबस्त चूक ठेवण्यात आला होता नगरपरिषद चे अधिकारी व कर्मचारी विसर्जनासाठी आमना नदीच्या काठावर उपस्थित होते

समस्त गणेश भक्तांनी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या स्वरामध्ये गणरायाला निरोप दिला

## हैदराबाद गॅझेट लागू करुन बंजारा समाजाला एस.टी.सवलतीचे आरक्षण द्या -गोरसेना

**संजय कडोळे : दै.विश्वजगत**

कारंजा :- निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा,लभाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा,लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह विदर्भ खानदेशचा भागमहाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षणसंपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले.त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस टी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे जिल्हाधिकारी यांना गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आज १० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.त्यामध्ये असे नमूद केले आहे की,महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते. मात्र भाषावार प्रांतरचना, राज्य पुनर्चना कायद्याचा फटका महाराष्ट्रातील





गोरबंजारा लमाण लंबाडी यांना बसला असून मुळ आरक्षणाला मुकावे लागले आहे .यासाठी गोरबंजारा समाजाने सातत्याने संघर्ष पुकारला असून त्यांना न्याय देण्यासाठी बापट आयोग,इधाते आयोग,भाटीया आयोग डिएनटी एस टी आयोगाने महाराष्ट्रातील गोरबंजारा हा अनुसुचित जमातीचे आरक्षणाबाबत सकारात्मक शिफारशी करुनही त्यांना ते आरक्षण देण्यात आलेले नाही. .डोंगर दर्यात राहणारा समाज आजही आदीम समुदायाची सर्व पात्रता पूर्ण करतो कारण स्वतंत्र बोली,भाषा,पेहराव,धाटीपरपंरा, स्वतंत्र तांडावस्ती,खानपान,स्वतंत्र असूनही त्यांना एस टी आरक्षणा पासून जाणीवपूर्वक टाळले जात आहे. अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, राष्ट्रसंत रामराव महाराजसह अन्य समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले असून -गोरसेना या बंजारा समाजातील अग्रगण्य संचटनेने गेल्या विस वर्षापासून मोर्चा आंदोलने केलेली आहेत. मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी मार्फत केलेली आहे.

## बायको ..... !

बायको जर नसेल तर
राजवाडा पण सुना आहे
बायकोला नाव ठेवणे हा
खरच गंभीर गुन्हा आहे
खरं पाहिल तर तिच्या
शिवाय पानही हलत नाही
घरातल कोणतच सुख
बायको शिवाय फुलत नाही
नोकरी अन पगारा शिवाय
नवऱ्याजवळ आहे काय
तुलनाच जर केली तर
सांगा तुम्हाला येत काय
स्वच्छ , सुंदर पवित्र घर
अहो , बायको मुळेच असतं
नवरा नावाचा विचित्र माणूस
तिलाच हसत बसत ...
वय कमी असून सुध्धा
बायको समजुतदार असते
तिच्यापेक्षा नवऱ्याचे वय
जरी जास्त असते .
तिचा दोष काय तर म्हणे
चांगल्या सवयी लावते
कुटुंबाच्या कल्याणा साठी
दिवस रात्र ती धावते
चिडत असेल अधून मधून
सहनशीलता संपल्यावर
तुम्हीच सांगा काय होणार
चोविस तास जुपल्यावर
बायकोची टिंगल करून
फिदी फिदी हसू नका
तिच्या यादीत मुर्ख स्थानी
नंबर एक वर बसू नका

**राजेश दौलतराव दामधर**
मु.पो. भारज बु
ता. जाफ्राबाद जि. जालना
मो. 97 30 45 79 40



VISHWA JAGAT -Printed & Published by GAJANAN RAJARAM KATE Printed at GAJANAN Printers : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.)1 and Published at VISHWA JAGAT Office : - FF4 NANA APRTMENT SAHKAMAGAR GORAKSHAN ROAD AKOLA 444001 (M.S.) Editor GAJANAN RAJARAM KATE Mob.No.9096873185 RNI No:- MAHMAR/2023/86213

विश्वजगत हे पत्र मालक, प्रकाशक, गजानन राजाराम काटे यांनी मुद्रक गजानन प्रिंटींग प्रेस, मुद्रण स्थळ FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून मुद्रित करून - कार्यालय : विश्वजगत कार्यालय,FF4 नाना अपार्टमेंट सहकामगर गोरक्षण रोड अकोला 444001 (M.S.) येथून प्रकाशित केले. संपादक : गजानन राजाराम काटे मो. 9096873185 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतील. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार कार्यकारी संपादक जबाबदार राहतील.) सर्व वाद विवाद अकोला न्यायालयांतर्गत राहील.) Email : dainikvishvjagato101@gmail.com RNI No:- MAHMAR/2023/86213

१ २ ३ ४ ५ ६

महत्वाचे

# दिव्यात घराफोडीतून दोन लाखांचे दागिने लंपास



संतोष पडवळ : दैनिक विश्वजगत

ठाणे : दिव्यात घराफोडी करून अज्ञात चोरट्यांनी जवळपास दोन लाखांचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी वैदिका विजय फेपडे (वय 36 वर्षे) रा. रूम नं. 04, तळमजला, हौसाबाई, गॅलेक्सी, न्यु माडेल किचनचे पाठीमागे, दिवा पूर्व येथे गेली ऐक वर्षांपासून आपले पती व मुलीसह राहतात दिनांक 05/09/2025 रोजी दोघेही पती पत्नी कामावर गेले होते तसेच.सायंकाळी मुलगी कु. वंशिका ही क्लासला गेली असता सायंकाळी ६ वा. चे सुमारास मी कामावरून घरी आले असता घराचे दरवाजाचा कोयंडा कापलेला दिसला व घराची पाहणी केली असता हालमध्ये असलेल्या लोखंडी कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने चोरीला गेलेले दिसून आले प्रकरणी मुंब्रा पोलीसमध्ये अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर चोरीस गेलेल्या दागिन्यांचे वर्णना नुसार जवळपास 1,79,100/- रू. एकुण किंमत असून आणखीही काही दागिने पावत्या नुसार चोरीस गेलेले दागिने हे किती याची खात्री होणार असून पुढील तपास मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा पोलीस करत आहे.

# सीईओ गुलाबराव खरात यांना न्यायालयाचा दणका
## बोराखेडी येथिल वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निलंबनाला स्थगिती

गोपाल काटे : दैनिक विश्वजगत

मोताळा :- प्राथमिक आरोग्य केंद्र बोराखेडी, येथे नियुक्त असलेल वैद्यकीय अधिकारी, डॉ. विवेक मोतीराम थिगळे व प्राथमिक आरोग्य केंद्र देऊळगाव माळी येथे नियुक्त असलेले डॉ.विशाल जगदिश सुरुसे यांच्या आरोग्य केंद्राला मुख्य कार्यकारी अधिकारी, बुलढाणा यांनी आकस्मिक भेट दिली असता त्यांना किरकोळ गैरवर्तनावरुन कोणतीही कारणे दाखवा नोटीसन देता डॉ.थिगळे व डॉ. सुरुसे यांना २० ऑगस्ट २०२५ रोजी निलंबित केले होते. परंतु, त्यांचावर लावलेले आरोप दोन्ही डॉक्टरांना मान्य नसल्यामुळे त्यांनी २५ ऑगस्ट रोजी मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुर येथे मुळ अर्ज दाखल करुन त्यांना दिलेल्या निलंबन आदेशाला आव्हान दिले होते. त्यावर मा. प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपुरने २ सप्टेंबर २०२५ रोजी आदेश पारीत करुन दोन्ही वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक मोतीराम थिगळे व डॉ. विशाल जगदिश सुरुशे यांना दिलेला निलंबन आदेश हा बेकायदेशिर असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दोन्ही वैद्यकीय अधिकाऱ्यांना निलंबन करण्याचा कोणताही हक्क नसल्यामुळे त्यांना दिलेल्या निलंबन आदेशाला स्थगिती दिलेली आहे. तसेच पुढील सुनावणी २२ सप्टेंबर २०२५ रोजी ठेवण्यात आलेली आहे. डॉ.थिगळे व डॉ. सुरुशे यांच्या तर्फे ॲड. पुरुषोत्तम पाटिल व ॲड. निखिल वाघमारे तर शासनाच्या वतीने ॲड. खडतकर यांनी बाजू मांडली.

# मुळावा येथे ओबीसीची चिंतन बैठक

गोपाल काटे : दैनिक विश्वजगत



मोताळा - ओबीसी समाजाच्या आरक्षणावर कुठल्याही प्रकारची कुरघोडी न होता त्यांचे शैक्षणिक राजकीय आरक्षणाचे न्याय - हक्क अबाधित ठेवण्यासाठी तालुक्यातील अनेक ठिकाणी सकल ओबीसी संघटन उमरखेडच्या वतीने संवाद दौरा चालू असून त्याअनुषंगाने आज रोजी ओबीसी समाजाची मुळावा सर्कल येथे चिंतन बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ओबीसी नेते ॲड. संतोष जैन, राजू भैया जयस्वाल, बाळासाहेब ओझलवार, सुनिल पाटील चिंचोलकर, बाळासाहेब चंद्रे, संभाजी गोरटकर यांची उपस्थिती लाभली होती. मान्यवरांकडून उपस्थित ओबीसी बांधवांना विविध विषयी मार्गदर्शन करण्यात आले. वक्त्यांनी सरकारच्या निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या मनात अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली तसेच सरकारच्या या निर्णयामुळे ओबीसी समाजावर होणाऱ्या दूरगामी परिणामावर सुद्धा चिंता व्यक्त केली.

उपस्थित ओबीसी बांधवांनी १७ सप्टेंबर रोजी उमरखेड येथे होणाऱ्या ओबीसीच्या एल्गार मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचा निर्धार सुद्धा यावेळी बोलून दाखविला.



# शिवाजी महाविद्यालय येथे जागतिक साक्षरता दिवस साजरा

प्रतिनिधी: दैनिक विश्वजगत

मोताळा - स्थानिक शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक 8 सप्टेंबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना , राष्ट्रीय छात्र सेना व इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक साक्षरता दिवस साजरा करण्यात आला.जागतिक साक्षरता दिन हा प्रतिवर्षी ८ सप्टेंबर या तारखेला साजरा केला जातो.आंतरराष्ट्रीय सहकार्यातून शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विकास व त्यातून शांतता व सुव्यवस्थेला उत्तेजन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या युनेस्कोने शिक्षणाचे, साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन ८ सप्टेंबर हा दिवस 'जागतिक साक्षरता दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरविले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव हे उपस्थित होते तर मंचावर प्रमुख उपस्थितीत इंग्रजी विभाग प्रमुख कॅप्टन अविनाश मेहेरकर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ प्रवीण ठेंग राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रमाधिकारी डॉ सुप्रिया बेहेरे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम सह अधिकारी डॉ अरुण गवारे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत तळेकर, प्रास्ताविक कॅप्टन अविनाश मेहेरकर, तर आभार प्रदर्शन डॉ प्रवीण ठेंग यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचा सुरक्षा विधेयकाला तीव्र विरोध

संजय महाजन: दैनिक विश्वजगत

कारंजा - राज्य सरकारकडून आणण्यात आलेल्या सुरक्षा विधेयकाविरोधात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने कारंजा येथे तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

या विधेयकामुळे नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर, वैयक्तिक स्वातंत्र्यावर व शांततेत आंदोलन करण्याच्या लोकशाही हक्कांवर गदा येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या कायद्याचा गैरवापर करून सामान्य नागरिक, कार्यकर्ते व पत्रकार यांना लक्ष्य करण्याची शक्यता असल्याचा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला.

लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या या विधेयकाचा निषेध करण्यासाठी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शांततामय आंदोलन हाती घेतल्याचे सांगण्यात आले. आमचे आंदोलन पूर्णपणे अहिंसक, शांततेचे व कायद्याच्या चौकटीत राहील, असेही पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देताना खालील पदाधिकारी व कार्यकर्ते दिलीप पाटील रोकडे, तालुका अध्यक्ष ओबीसी सुमित पाटील,युवक जिल्हाध्यक्ष भुजंगराव वाकळे,जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ नागरिक सेल श्रीधर पाटील कानकिरड जिल्हा मध्यवर्ती बँक उपाध्यक्ष ,ज्योतीताई गणेशपुरे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वाशिम,डॉ. अशोक मुंदे ,अजय पाटील रंगे,किरण पाटील ठाकरे,रोशन पाटील वाकळे,शुभम वाकळे,विनोद वाकळे,मनोज खाडे,चंद्रकांत पाटील, नितीन पाटील गाडगे,अमोल तायडे,युवराज पाटील किरण पाटील ठाकरे किरण पाटील ठाकरे तुळशीराम तायडे संकेत नाकले दिनेश वाडेकर शुभम बोनकेअजय राठोड कार्यकर्त्यांनी सह्या केल्या. या सर्व पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने तहसील कार्यालयात दाखल झाले होते.




# ठाणे महानगरपालिकेत प्रभाग रचना हरकती व सूचनांवरील सुनावणी संपन्न; एकूण मांडल्या 270 हरकती आणि सूचना

संतोष पडवळ: दैनिक विश्वजगत




ठाणे (१०) : महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा जाहीर करण्यात आला आहे. या प्रारुप आराखड्यावर एकूण २७० हरकती आणि सूचना मांडण्यात आल्या. या हरकती व सूचनांच्या सुनावणीसाठी राज्य शासनाने अपर मुख्य सचिव (परिवहन व बंदरे) संजय सेठी यांना प्राधिकृत केले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे प्रत्यक्ष सुनावणी झाली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९च्या कलम ५ (३) च्या तरतुदीखाली ठाणे महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या व प्रभागांची संख्या निश्चित केली आहे. ठाणे महानगरपालिकेत एकूण सदस्यांची संख्या १३१ आहे. एकूण प्रभागांची संख्या ३३ आहे. त्यापैकी, चार सदस्यीय प्रभागांची संख्या ३२ असून तीन सदस्यीय प्रभागांची संख्या १ आहे. प्रारुप अधिसूचनेद्वारे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिकांना ०४ सप्टेंबरपर्यंत हरकती किंवा सूचना मांडण्याचा अवधी देण्यात आला होता. या अवधीत काळात नोंदवण्यात आलेल्या हरकती आणि सूचना यांच्यावर बुधवारी प्रत्यक्ष सुनावणी झाली. या सुनावणीसाठी व्यासपीठावर, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (निवडणूक) उमेश बिरारी, सहाय्यक संचालक, नगररचना संग्राम कानडे, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे, कार्यकारी अभियंता देवेंद्र नेर आदी उपस्थित होते.

प्रभाग समितीनिहाय - हरकती आणि सूचना
माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती - ५९
दिवा प्रभाग समिती - १२२
मुंब्रा प्रभाग समिती - ०८
कळवा प्रभाग समिती - ०४
वागळे प्रभाग समिती - ०१
नौपाडा-कोपरी प्रभाग समिती - ४३
लोकमान्य नगर - सावरकर नगर प्रभाग समिती - ०३
उथळसर प्रभाग समिती - १७
वर्तक नगर प्रभाग समिती - १३
एकूण - २७०

# ठाणे मनपाच्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंग व शास्तीच्या कारवाईची टांगती तलवार

संतोष पडवळ: दैनिक विश्वजगत




ठाणे : माहिती अधिकार कार्यकर्ते श्री अनुपकुमार प्रजापती यांनी दिनांक 17 ऑक्टोबर 2022 रोजी रस्ता रुंदीकरणातील प्रकल्पग्रस्त श्री सतीश ठक्कर यांच्या पुनर्वसनासाठी केलेल्या अर्जावर झालेल्या कारवाईबाबत माहिती मागितली होती. माहिती मागितल्यानंतर ठाणे महानगरपालिकेतील स्थावर मालमत्ता विभागातील अधिकाऱ्यांनी सदर अर्जास केराची टोपली दाखवली व अर्जदारास कोणतीही माहिती दिली नाही. तदनंतर माहिती अधिकार कायद्यान्वये विहित मुदतीत अर्जदाराने प्रथम अपील दिनांक 2 डिसेंबर 2022 रोजी दाखल केले. मात्र स्थावर मालमत्ता विभागाच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत हलगर्जीपणा दाखवत सुनावणी तर दिली नाही परंतु प्रथम अपीलही गहाळ केले.

कोणताही पर्याय अर्जदार श्री अनुप कुमार प्रजापती यांच्याकडे शिल्लक न राहिल्यामुळे अखेरीस राज्य माहिती आयोगाकडे 10 मार्च 2023 रोजी द्वितीय अपील दाखल केले. मा. राज्य माहिती आयोग कोकण विभाग यांच्याकडे झालेल्या सुनावणी वेळी ठाणे महानगरपालिकेकडून हजर झालेले झालेल्या स्थावर मालमत्ता विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा प्रथम आपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोग यांना माहिती न देण्याचे कारण त्या काळात कोरोना प्रादुर्भाव कामासाठी कार्यरत असल्याचे कारण देऊन माहिती देणे शक्य झाले नाही असे सांगितले शिवाय यात वरील कारणामुळे सुनावणी ही घेता आली नसल्याचे सांगितले. यासोबतच माहिती अधिकार अर्जदार यांना 01 ऑगस्ट 2025 रोजीचे पत्र सुपूर्द करण्यात आलेल्या पत्रामध्ये माहिती ही विस्तृत स्वरूपाची असल्याकारणाने आवश्यक असलेल्या माहितीचे निरीक्षण करण्याकरिता अर्जदार यांना बोलविण्यात आल्याचे कळविले होते. यावर माननीय राज्य माहिती आयोगाने असे नोंदविले आहे की अर्जदार श्री अनुप कुमार यांनी ठाणे महानगरपालिकेकडे 30 ऑगस्ट 2022 व तदनंतर 23 सप्टेंबर 2022 रोजी पुनर्वसन करण्यासाठी विषयासंदर्भात अर्ज व स्मरण पत्र दिले होते. या अर्जाच्या अनुषंगाने अनुप कुमार प्रजापती अर्जदार यांनी झालेल्या कारवाईची कार्यवाहीची माहिती अपेक्षित होती परंतु ही माहिती विस्तृत स्वरूपाची कशी ? याबाबत ठाणे महानगरपालिकेचे स्थावर मालमत्ताचे सहाय्यक आयुक्त व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यांना खुलासा करणे आयोगासमोर जमले नाही. या सोबतच श्री राजेश सोनवणे यांनी अर्जदार यांनी केलेल्या अर्जाच्या प्रती ठाणे महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध नसल्याचे आयोगास सांगितले. सदर गंभीर बाब दडवून ठेवत आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा आयोगास आढळून आले असल्यामुळे आयोगाने ठाणे महानगरपालिकेचे प्रथम आपल्या अधिकारी श्री सोनावणे यांनी आयोगास दिशाभूल करण्याचे प्रयत्न केल्यामुळे त्यांच्या विरोधात विभागीय कार्यवाही सुरू करण्याची शिफारस माननीय ठाणे महापालिका आयुक्त यांना का सादर करू नये याचा खुलासा मागितला आहे. यासोबतच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री प्रशांत पाठक यांनी विहित मुदतीत अर्जदार यांना माहिती न दिल्यामुळे व माहिती देण्यास झालेल्या विलंबामुळे प्रत्येक दिवसासाठी 250 रुपये अधिकतम 25 हजार रुपये इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा मागितला आहे. सदर खुलासा 17 सप्टेंबर 2025 रोजी होणाऱ्या सुनावणी वेळी दाखल करण्याचे आदेश राज्य माहिती आयोगाने दिले आहेत.

# बोराखेडी येथे पैगंबर जयंती (ईद ए मिलाद ) जल्लोषात साजरी

गोपाल काटे : दैनिक विश्वजगत



मोताळा - तालुक्यातील बोराखेडी येथे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या 1500 व्या जयंती विविध कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात आली सकाळ पासून लहान मुलांचा स्पर्धा चा कार्यक्रम घेण्यात आला लहानगया चा उत्साह गगनाला मावेनासा झाला त्यानंतर दुपार सत्रात जामा मशीद चे इमाम मौलाना अल्ताफ खा साहब यांनी मशीदित बयान (प्रवचन ) झाला या बयान मध्ये मौलवी साहेब यांनी हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांचा जीवन चरित्र व आदर्श जिवन तसेच जगाला शांती चे संदेश अश्या विविध विषयाचा उहापोहचलो केला त्यानंतर नमाज ए जुमा अदा करून गावातून फेरी काढण्यात आली फेरी मध्ये गावातील ज्येष्ठ नागरिका सह लोकांचा सहभाग चांगला होता त्यानंतर शादी खाना परिसरात जेवणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गेल्या आठवड्याभरा पासून अहमद मेंबर, जाकीर ठेकेदार, मोहसीन खान, शोएब हमीद, हुसैन, लाला, सय्यद रिजवान, सय्यद नाजीम इत्यादी लोकांनी परिश्रम घेतले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जामा मस्जिद पंच कमेटी चे सहकार्य लाभले.

१ २ ३ ४ ५ ६

महत्त्वाचे

## पत्रकार दिलीप घरटे यांची भाजप शहर मंडळ उपाध्यक्षपदी निवड - कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण



संजय महाजन: दैनिक विश्वजगत

शिर्डी - सामोडे येथील भारतीय जनता पार्टी चे जेष्ठ कार्यकर्ते आणि जेष्ठ पत्रकार दिलीप घरटे यांची भारतीय जनता पार्टी पिंपळनेर शहर मंडळ उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली दिलीप घरटे हे गेल्या 30वर्ष पासून एकनिष्ठ पक्षाचे काम करत आहेत लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या उपस्थित भाजप मध्ये प्रवेश घेतला तेव्हा पासून आज पर्यंत सामोडे गावात पक्ष वाढवला जेव्हा सामोडे गावात फक्त दोन सिलेदार होते त्यात कै विलास घरटे व दिलीप घरटे यांनी पक्षाचे काम निष्ठे सुरु ठेवले
दिलीप घरटे हे सामोडे पिंपळनेर परीसर जेष्ठ पत्रकार असुन पिंपळनेर पत्रकार संघ चे उपाध्यक्ष सामोडे येथील साईबाबा पाणी वाटप संस्था चे चेअरमन सामोडे वि का सो चे मा व्हा चेअरमन आखिल भारतीय माळी महासंघ चे मा उपाध्यक्ष होते आता भारतीय जनता पार्टी पिंपळनेर शहर मंडळ चे उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली त्यांच्या नियुक्ती चे सर्व स्तरावर अभिनंदन होत आहे

# ‘भिम गर्जना’ या सामाजिक संघटनेचा उद्घाटन

अजय टप : दैनिक विश्वजगत

मलकापूर - अन्याय, अत्याचार विरोधात लढणारी ‘भिम गर्जना’ या सामाजिक संघटनेचा उद्घाटन सोहळा आज १० सप्टेंबर रोजी स्थानिक प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा (रेल्वे स्टेशन) जवळ येथे आयोजित करण्यात आला होता. समाजामध्ये गोरगरीब, शेषित, पिडीत व अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याच्या उदात्त भावनेतून संस्थापक अध्यक्ष भिवाभाऊ चोपडे यांनी ‘भिम गर्जना’ या सामाजिक संघटनेची स्थापना केली. भिम गर्जना या सामाजिक संघटनेचे उद्घाटन पु.भंते मोग्गलायन व



बौध्दाचार्य प्रभाकर इंगळे यांच्या हस्ते त्रिशरण पंचशील ग्रहण करून तसेच महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण व अभिवादन करीत करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष भिवाभाऊ चोपडे यांचेसह बाहपुरा येथील समाजसेवक मधुकर निकम, वडोदा येथील समाजसेवक बाबुराव वाकोडे, धरणगाव येथील समाजसेवक आर.एन.वानखेडे

> समाजातील चुकीच्या बाबींना आळा घालण्यासाठी तसेच सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणे तसेच शासन, प्रशासनाकडून जनतेची होणारी अडवणूक या विरोधात ‘भिम गर्जना’ ह्या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले जाईल. या संघटनेच्या उद्घाटन प्रसंगीच अनेकांनी आम्हाला काम करण्याची इच्छा असल्याचा मानस यावेळी बोलवून दाखविला आहे. त्यामुळे लवकरच संघटनेच्या जिल्हा, तालुका, शहर अशा ठिकठिकाणच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करून कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल.
> **- भिवाभाऊ चोपडे**, संस्थापक अध्यक्ष भिम गर्जना सामाजिक संघटना

गुरुजी, दाताळा येथील समाधान पवार, रामदास खराटे, मोरखेड येथील समाजसेवक सुनील महाले, हरसोडा येथील सापुर्डा मोरे, श्यामदादा चोपडे, अंकित भैय्या, प्रतीक भैया, जांभूळ धाबा येथील येडूभाऊ इंगळे, डॉ.विजय भगत यांचेसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.



# वंचित बहुजन आघाडीची लासुरा येथिल स्मशानभूमीची मागणी पूर्णत्वाकडे

अजय टप : दैनिक विश्वजगत

मलकापूर - तालुका वंचित बहुजन आघाडीने लासुरा येथे स्मशानभूमी व्हावी या मागणीसाठी मागील महिन्यात दिनांक 05.08.2025 ला तालुकाध्यक्ष अजय सावळे व महासचिव भीमराव नितुने यांच्या नेतृत्वात माननीय उपजिल्हाधिकारी संतोषराव शिंदे यांना निवेदन दिले होते. आणि तेथील स्मशानभूमीची अवस्था आणि मृतदेहाच्या अंत्यविधी संदर्भात उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार साहेब यांच्यासोबत चर्चा केली होती .आणि तिथे स्मशानभूमीची मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेऊन तहसीलदार माननीय राहुल जी तायडे यांनी संबंधित मंडळ अधिकारी आणि पटवारी यांना निर्देश देऊन स्थळ पाहणी करता पाठविले होते. याबाबत सविस्तर वृत्त असे की ग्राम लासुरा येथे अंत्यविधी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. पावसाळ्यात तर अतिशय बिकट परिस्थिती असते. नदीकिनारी अंत्यसंस्कार करण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे मृतदेहाची विटंबना होते. याबाबत स्थानिक वंचित बहुजन आघाडीच्या



पदाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांनी तालुकाध्यक्ष अजय सावळे यांना यासंबंधीची माहिती दिली. या संवेदशील प्रकाराची त्वरित दखल घेऊन दिनांक05.08. 2025 ला तालुका वंचित बहुजन आघाडी तर्फे तहसीलदार साहेबांना निवेदन देण्यात आले. आणि स्मशानभूमी जागा आणि स्मशानभूमी बांधून देण्यात यावी या संबंधात निवेदन दिले. आणि या संवेदनशील बाबीची दखल घेतली नाही तर वंचित बहुजन आघाडी तर्फे तीव्रआंदोलन छेडले जाईल असा इशारा देण्यात आला होता. या निवेदनाची दखल घेऊन कर्तव्यदक्ष तहसीलदार राहुल तायडे यांनी आज प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यासाठी त्या भागाचे मंडळ अधिकारी झिणे ताई आणि तलाठी गाडे ताई यांना पाठविण्यात आले होते. तेव्हा तिथे स्थानिक तालुक्याचे अध्यक्ष आणि पदाधिकारी आणि गावकरी मंडली उपस्थित होते. मंडळ अधिकारी यांनी सदर अहवाल लवकर तहसीलदार साहेबांना देण्यात येऊन हा प्रश्न मार्गी लागेल असे आश्वासन दिले. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आणि त्यांनी तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

निवेदन देतेवेळी या गंभीर बाबीची दखल घेऊन लोकमत वृत्तपत्राचे मलकापूर येथील प्रतिनिधी हनुमान जगताप यांनी सदर घटनेची प्रसिद्धी आपल्या वर्तमानपत्रात ठळक पणे प्रकाशित केली त्यामुळे सुद्धा या बाबीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते आणि प्रशासनाला या बाबीची गंभीर दखल घ्यावी लागली. करिता गावकऱ्यांनी लोकमतचे प्रतिनिधी हनुमान जगताप यांचे सुद्धा आभार व्यक्त केले.

स्थळ पाहणी करण्याकरिता प्रशासनासोबत गावातील प्रतिष्ठित नागरिक रामभाऊ गवई, गौतम गवई ,मोहन गवई ,बाबुराव गवई, गरमोडे बंधू आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ.अल्लामा इकबाल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत तालुकास्तरीय प्रेषित मोहम्मद साहेब ह्याची जयंती साजरी

प्रशांत सरनाईक : दै.विश्वजगत

रिसोड: स्थानिक रिसोड दिनांक 9 सप्टेंबर रोजी शाळेत कबीर मोहसीन साहेब यांचे अध्यक्षतेखाली प्रेषित मोहम्मद साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली होती या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भिकन सेट खाजाभाई मुक्ती मोहम्मद युनूस साहब, हाजी वहीद भाई , यांची उपस्थिती होती प्रस्ताविक भाषण प्राचार्य जमीर अहमद खान यांनी केले सदरहू कार्यक्रम तालुकास्तरीय घेण्यात आला यामध्ये रिसोड तालुक्यातील परमवीर अब्दुल हमीद प्राथमिक शाळा, डॉ अल्लामा इकबाल प्राथमिक शाळा रिसोड, रहमानिया उर्दू हायस्कूल रिसोड, डॉक्टर अल्लामा इक्बाल माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा रिसोड ह्या शाळा सहभागी झाले होते. यामध्ये एकूण 21 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. वर्ग पाच ते सात हा पहिला ग्रुप वर्ग आठ ते दहा दुसरा ग्रुप व वर्ग अकरावी ते बारावी तिसरा ग्रुप असे ग्रुप तयार करण्यात आले होते यामध्ये शाह फैसल खान यांनी प्रत्येक ग्रुपमध्ये प्रथम येणाऱ्याला



अकराशे रुपये नगद पारितोषिक दिले , तसेच एस आय ओ युनिट रिसोड यांचे कडून पुस्तकाचे रूपात व सन्मानपत्र पारितोषिक देण्यात आले हाजी वहीद साहब यांच्याकडून प्रत्येक ग्रुप मधून दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्याला पाचशे रुपये रोख असे बक्षीस ठेवले होते. शहरातील विविध प्रतिष्ठित नागरिक शेख खाजा शेख फरीद, मुस्ताक हुसेन, बाबू कुरेशी, झहीर सेठ कुरेशी , अब्दुल रब भाई, मोहम्मद आकीब यांच्याद्वारे रोख बक्षीस वितरण करण्यात आले. इनायत खान दुकानदार यांच्याकडून स्पर्धेमध्ये सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला पेन आणि वह्या असे बक्षीस दिले. राजू भाई ठेकेदार यांच्याकडून रोख बक्षीस ठेवण्यात आले होते. पहिला ग्रुप वर्ग पाच ते सात मधून आलिया परवीन शेख यूनूस प्रथम आली हफसा दुर्रानी बिलाल अहमद खान दुसरा क्रमांक तर अरीशा अज़फरीन अबरार अहमद खान तिसरा क्रमांक. वर्ग आठ ते दहा च्या ग्रुप मधून मोहम्मद तलहा समीररोद्दीन हा विद्यार्थी प्रथम आला. दुसऱ्या क्रमांकावर जूबिया फातिमा अस्लम खान, तिसऱ्या क्रमांकावर हलीमा सादिया अब्दुल सलाम. तिसरा ग्रुप वर्ग अकरावी ते बारावी यामधून प्रथम येण्याचा बहुमान मलीहा फातेमा मोहम्मद जावेद, दुसरा क्रमांक माहीन खातून अतीक खान, तर तिसरा क्रमांक आलिया फिरदोस अयुब खान यांनी पटकविला. तसेच मुलांमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोहम्मद आकीब यांचे द्वारे रोख बक्षीस वितरण करण्यात आले. संचालन व आभारमोहम्मद सादिक ह्यांनी तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यास सर्व शिक्षकांनी व शिक्षिका ह्यांनी परिश्रम घेतले.

# लेवा समाजातील गुणवंतांचा सत्कार सोहळा उत्साहात

अजय अप: दै.विश्वजगत

मलकापूर- लेवा शुभमंगल व लेवा युथ फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम भ्रात्रू मंडळ मलकापूर, पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, दीपक टेन्ट हाऊस व परिसरातील शिक्षक वृंद यांच्या सहकार्याने घेण्यात आला. अध्यक्षस्थान कोलते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे सरांनी भूषविले. कार्यक्रमाला श्री. डी. टी. खाचणे (अध्यक्ष बुलढाणा भ्रात्रू मंडळ), श्री. दिनकर नारखेडे, श्री. सुधीर पाचपांडे, डॉ. प्रफुल ढाके,श्री. बंडूभाऊ चौधरी, श्री. अमित नाफडे, श्री. हर्षल भंगाळे (अध्यक्ष लेवा युथ फोरम), श्री. हर्षल जावळे (लेवा शुभमंगल), श्री. अतुल महाजन (अध्यक्ष डोंबिवली शहर), श्री. अविनाश




बोरले सर (प्राचार्य नूतन विद्यालय), सौ. निशा वराडे (अकोला) आदी मान्यवर उपस्थित होते. समाजातील विद्यार्थ्यांच्या व व्यक्तींच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. डॉ. मंजिरी नितीन खर्चे यांना संगणक क्षेत्रात डॉक्टर पदवी प्राप्त केल्याबद्दल, तर डॉ. दीपक अशोक झोपे यांना भौतिकशास्त्र विषयात सीईटी परीक्षेत महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयातील कोमल राणे, तुषार पाटील, राधिका पाटील, पूजा खडसे, अर्पिता खर्चे, अर्पित बढे अश्विन लोखंडे, विनय पाटील, रोशन भारंबे व सचिन फिरके या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संजय खर्चे सर (बुलढाणा) यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले. यावेळी आर. जी. चोपडे सर, कीर्ती ताई बोरले, वैशाली फालक, लीना येवले, अतुल महाजन, तेजस चौधरी, रमाकांत राणे, प्रा. साकेत पाटील, प्रा. गजानन सुपे, प्रा. नितीन खर्चे व प्रा. सचिन बोरले यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# मातृतीर्थाच्या पिंपळ खुट्टा येथील घुगे परिवारातील दोन भावंडांची परदेशात भरारी

## पूजा लंडनमध्ये तर प्रमोद अमेरिकेच्या कॅलिफोर्नियात उच्च पगारासह करतोय जॉब

अनिल दराडे: दैनिक विश्वजगत

सिंदखेडराजा -मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यातील पिंपळखुटा गावचे रहिवाशी असलेले गटविकास अधिकारी बि. डी. घुगे यांची दोन्ही मुले मुलगी पूजा डोईफोडे/ घुगे ही इंग्लंड मध्ये तर मुलगा प्रमोद घुगे यांची अमेरिकेत कॅलिफोर्निया मध्ये नामाकींत कंपनी मध्ये निवड झाली असल्यामुळे या दोन घुगे परिवाराच्या भावंडांनी पिंपळ खुट्टा या गावा सह मातृतीर्थाचे नाव रोशन केले आहे .

बि डी घुगे यांची कन्या सौ. पूजा अमोल डोईफोडे / घुगे ही लंडन येथील नामांकित आयटी कंपनीमध्ये १ कोटी रुपयांच्या भक्कम पॅकेजवर निवड झाली असून ती नुकतीच लंडनला रवाना झाली. कोल्हापूर येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असताना तिने अथक परिश्रम व कौशल्याच्या जोरावर परदेशातील कंपनीत आपले स्थान पक्के केले.

तर दुसरीकडे श्री. घुगे यांचा सुपुत्र प्रमोद घुगे हा आयआयटी वाराणसीतून आपले उच्च शिक्षण पूर्ण करून दोन वर्षे बेंगलोर येथील जे.पी. मॉर्गन कंपनीत कार्यरत होता. त्यानंतर त्याची अमेरिकेतील कॅलिफोर्नियात सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून निवड झाली. प्रमोदला मिळालेले २ कोटी २५ लाख रुपयांचे पॅकेज आज त्याच्या गुणवत्तेची साक्ष देत आहे.

या दोन्ही मुलांनी बालपणी कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक-माध्यमिक शिक्षण घेतले. साध्या शाळेतून घडलेले हे विद्यार्थी आज




जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवत आहेत, ही खरंच संस्कार, मेहनत आणि ज्ञानाची कमाल आहे. आई–वडिलांच्या संस्कारांची ताकद आणि मुलांच्या जिद्दीचे फळ... आज मातृतीर्थ नगरीच्या मातीला जागतिक कीर्ती लाभली आहे.”

मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. बी. डी. घुगे यांच्या परिवारातील दोन भावंडांनी आपल्या कर्तृत्वाने परदेशात भरारी घेत गावाचे व कुटुंबाचे नाव उज्ज्वल केले आहे. आपल्या मुलांच्या या यशाबद्दल श्री. व सौ. घुगे यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले – “आमच्या दोन्ही मुलांनी आपल्या बुद्धीमत्तेने, उच्च शिक्षणाने आणि जिद्दीने घर, गाव व देशाचे नाव उज्ज्वल केले.

आज आमच्या डोळ्यांतील पाणी हे आनंदाश्रू आहेत, अभिमानाने भरलेले आहेत.” आज सिंदखेडराजा नगरीत घुगे परिवाराचे नाव घेताना प्रत्येकाच्या ओठांवर एकच भावना उमटत आहे – “हीच खरी संस्कारांची श्रीमंती आणि आई–वडिलांच्या आशिर्वादांची ताकद आहे.”

# रस्त्यावर गवत टाकले या शिल्लक कारणावरुन लठया काठ्यांनी जबर मारहाण किनगाव राजा पोलिसात परस्परांच्या विरोधात गुन्हा दाखल

अनिल दराडे : दै.विश्वजगत

सिंदखेडराजा - येथील भावकीच्या वादातून रस्त्यावर कांडी गवत का टाकले अशा शिल्लक कारणावरून दोन गटात लाठया काठ्यांनी तुंबळ हाणामारी दि 4 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी नऊ वाजेदरम्यान झाली दोन्ही गटाकडून परस्परांना बेदम हाणामारी करण्यात आल्याची घटना घडली दोन गटांच्या परस्पर तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर आरोपींना अटक करीत आज दिनांक 9 सप्टेंबर रोजी सर्वांना एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे याबाबत असे की, दुसर बीड येथील शेख रोशन शे. करमत यांनी पोलीस स्टेशन ला दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शेख बाबू शेख गाणी शेख रफिक शेख गणी शेख नसीर शेख गणी शेख शेख फैजान शेख नसीर शेख राहील शेख बाबू व शेख अल्ताफ शेख बाबू यांनी हातामध्ये घेऊन रस्त्यावर कांडी गवत का टाकले असे म्हणून शेख इरफान शेख करामत यस बेदम मारहाण केली व शिवीगाळ करीत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या अशी फिर्याद किनगाव राजा पोलीस स्टेशन ला दिली तर दुसऱ्या गटाकडून शेख रफिक शेख गणी यांनी दिलेले फिर्यादीवरून शेख इरफान शेख करमत यास रस्त्यावर गवत का टाकली अशी विचारणा केली असता शेख बाबू शेख गाणी याने चौकशी केली असता आरोपी शेख इरफान शेख करमत शेख लाल शेख मिया शेख रोशन शेख करामत शेख अल्ताफ शेख मेहता व शेख मुख्तार शेख जब्बार यांनी दुसर बीड शिवारांमधील त्यांच्या राहत्या घराजवळ शेख बाबू शेख गणी यांना हातामध्ये लाट्या काठ्या घेऊन मारहाण व शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली अशी फिर्याद दुसऱ्या गटाकडून देण्यात आली.यावरून किनगाव राजा पोलिसांनी दोन्ही गटाच्या आरोपीं विरूध्द विविध कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करून दि 8 सप्टेंबर रोजी सर्व आरोपींना अटक केली आज दि 9 सप्टेंबर रोजी न्यायालय सिंदखेडराजा येथे आरोपीस हजर करण्यात आले असता न्यायालयाने सर्व आरोपींना एक दिवसाची पोलीस कुठली सुनावली आहे पुढील तपास ठाणेदार संजय मारतोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीटजमादार श्री विष्णू मुंढे व शिवाजी बारगजे हे तपास करीत आहे



१ २ ३ ४ ५ ६

# टाकळी येथे आगळ्यावेगळ्या पध्दतीने बाप्पाला भावपूर्ण निरोप

## 60 ते 70 भजनी मंडळाने पावली करीत काढली भव्य मिरवणूक

**गोपाल काटे : दै.विश्वजगत**

मोताळा- गणेश चतुर्थीला मोताळा तालुक्यातील टाकळी वाघजाळ येथे छत्रपती गणेश मंडळाने मोठ्या भक्तीभावात गणपती बाप्पाची स्थापना केली होती. 6 सप्टेंबर रोजी गावातून बाप्पाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी 60 ते 70 भजनी मंडळानी टाळ,मृदुंगाच्या निनादात पावली करीत गणपती बाप्पाचा जयघोष करीत पावल्या करीत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

छत्रपती गणेश मंडळाने मोठ्या भक्तीभावाने बाप्पाची स्थापना केली. बाप्पाची दहा दिवस मनोभावे सेवा करुन मोठ्या जड अंत:करणाने शनिवार 6 सप्टेंबर रोजी ट्रॅक्टरवर बाप्पाची मुर्ती विराजमान करुन गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये खामगाव तालुक्यातील निपाणा येथील जय गजानन वारकरी सेना भंजनी मंडळाने प्रसन्न व भावनीक वातावरण निर्मीती केली. या भजनी मंडळात पुरुषांसह महिलांचा मोठा समावेश होता. महिलांनी भगव्या रंगाच्या साड्या तर पुरुष व मुलांनी पयजामा, शर्ट व टोपी घालून बाप्पाच्या मिरवणुकीला सायंकाळी 5 वाजता सुरुवात करण्यात आली. बाप्पाच्या मिरवणुकीच्या दिंडीचे महिलांनी आपल्या दारासमोर पाणी टाकून रांगोळ्या काढून स्वागत केले. भजनीमंडळाने पावल्या, फुगड्या खेळीत गावातील वातावरण प्रसन्नमय केले होते. टाळ, मृदूंगाच्या निनादात गणपती बाप्पा मोरया, पुढच्यावर्षी लवकर या, बाप्पा मोरया या घोषणांनी टाकळी परिसरात वातावरण प्रसन्न झाले होते. गावातून मिरवणूक काढून रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास बाप्पाचे भावपूर्ण वातावरणामध्ये विसर्जन करण्यात आले. या मिरवणुकीमध्ये मंडळाचे अध्यक्ष, सदस्य तसेच गावातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.








## कलासाधना सामाजिक संस्था, नवी मुंबई यांच्या मार्फत विविध पुरस्कार जाहीर; धुळे जिल्ह्यातून राजेंद्र गवळी

**संजय महाजनः दै.विश्वजगत**

शिर्डी :नवी मुंबई येथील कलासाधना सामाजिक संस्था, यांच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रस्तरीय प. पू. साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, समाजभुषण पुरस्कार, व जीवन गौरव पुरस्कार जाहीर झालेले असून , पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि.०७ सप्टेंबर २०२५ रोजी कराडी समाज हॉल, कामोठे, नवी मुंबई येथे मुख्य अतिथी व शुभहस्ते अच्युत पालव पद्मश्री (भारत सरकार२०२५) सुप्रसिद्ध जेष्ठ आंतरराष्ट्रीय सुलेखनकार,प्रमुख पाहुणे म्हणून दिगंबरतायडेपद्मश्रीपुरस्कार(नामांकन२०२६) दानशूर व्यक्तिमत्व, कॅप्टन मनोज भामरे माजी लष्करी अधिकारी (भारतीय लष्करातील शॉर्ट सर्व्हिस कमिशन्ड अधिकारी)रामजीत (जितू)गुप्ता (मुख्य तपास अधिकारी, अँटी पायरसी सेल मुंबई)प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सपन्न होणार आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ८३० अर्ज प्राप्त झाले होते, त्यातून ५० विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची



पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल श्यामची आई पुस्तक देवून सन्मानित करण्यात येणार आहे, असे आयोजक संस्थेच्या अध्यक्ष मेघा महाजन यांनी सांगितले. पुढील पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या नावांची घोषणा या वेळी बोलतांना त्यांनी केली. प. पू. साने गुरुजी जीवन गौरव पुरस्कार उल्हास देशमुख, शारदा राणा,राजेंद्र जावळे,फुंदे शरदराव रघुनाथ

प. पू. साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार उषा सिंह,गोरे मनेश बब्रुवान, कृष्णा पाटील,आसिया परविन अब्दुल रहमान,राकेश महाजन,सुरेश जाधव,अर्चना मारकड,महेश जाधव, साधना कोपनर,. राजन राठोड,जयसिंग बेटकर,विठ्ठल म. मणूरे, सुनील म्हात्रे.पुनम देसाई, मानसी चव्हाण.सिताराम प्रभु,धनाजी थिटे,किरण सरोदे, ऋता भामरे.नुरी गुलाम मोहम्मद मुस्तफा,मंदार चोरगे. के. परमेश्वर,नितीन मोहरीर, स्मिता प्रल्हाद जोशी,संतोष साखरे,श्रद्धा बनसोडे,चंद्रशेखर साळवे, नरेश लोहार.सुरेश वाघमारे,नॅन्सी मुथु स्वामी,काजल सुर्वे,विजय वाघेला प. पू. साने गुरुजी समाज भूषण पुरस्कार अजय जिरापुरे,विलास खंडेराव समेळ , गोरखनाथ पोळ, अनिल पाटील,संध्या भांगरे, सत्यवती खळदकर,रवींद्र माहिमकर,विपीन राऊत,सुमन देसाई,दिलीप मोकल,अनंत देवघरकर,राजेंद्र गवळी, अमित कांबळे, परशुराम घाडगे यांचा समावेश आहे.

## साईसंस्थान कर्मचारी सोसायटीचे कर्मचारी रमेश वाघे यांनी सापडलेले सोन्याचे मनी प्रामाणिकपणे साईभक्तांला केले परत!

**संजय महाजन : दै.विश्वजगत**

शिर्डी - सध्याच्या आधुनिक व धकाधकीच्या जीवनामध्ये प्रामाणिकपणा, इमानदारी विसरत चालली असताना काही ठिकाणी किंवा काही व्यक्तींकडून अजूनही आपला प्रामाणिकपणा, इमानदारी जपली जात आहे. असे अनेक उदाहरणे शिर्डीमध्ये विशेषता साई संस्थांन परिसरात दिसून येत आहे. साई भक्तांचे सापडलेल्या अनेक मौल्यवान वस्तू त्यांना प्रामाणिकपणे परत देण्याचे काम आतापर्यंत अनेक संस्थान कर्मचारी यांनी केले आहे. . अशीच प्रामाणिकपणाची घटना नुकतीच शिर्डी येथे घडली आहे. शिर्डी येथील साईबाबा संस्थान कर्मचारी सोसायटीचे कर्मचारी श्री. रमेश दगडू वाघे यांना मोबाईल लॉकर जवळ सोन्याचे सात मणी सापडले. सदर सोन्याचे मणी त्यांनी तत्काळ संरक्षण कार्यालयात जमा केले.सदरचे मणी हे साईभक्त श्री. प्रशांत बंडू चौधरी, राहणार अहमदनगर यांचे असल्याचे ओळख पटले. त्यानंतर या साई भक्तांना त्यांचे सोन्याचे मणी परत करण्यात आले. या प्रामाणिकपणाबद्दल रमेश दगडू वाघे यांचा सुरक्षा अधिकारी श्री भाऊसाहेब जाधव यांनी त्यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे या प्रामाणिकपणाबद्दल रमेश वाघे यांचा साई संस्थान अधिकारी कर्मचारी तसेच साई संस्थान कर्मचारी सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार व सर्व पदाधिकारी संचालक ,अधिकाऱ्यांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. व त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल सर्व थरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




## विजयाच्या शिल्पकार ठरलेल्या व्यवस्थापिका सौ.आशाताई राऊत यांचा भव्य सत्कार

**संजय कडोळे : दै.विश्वजगत**

कारंजा (लाड) : येथील स्थानिक विदर्भ लोककलावंत संघटना, करंजमहात्म्य परिवार आणि मेघनभाऊ जुमळे मित्र मंडळाच्या वतीने, 'प्रशिक ग्रामिण सहकारी पतसंस्थेच्या' निवडणूकीत विद्यमान संचालकांच्या 'विकास पॅनल'ने घवघवीत यश मिळवून, विरोधकांना 'पळता भुई थोडी' करून,एकहाथी विजय मिळवील्या बद्दल त्याचे श्रेय सर्वार्थाने पतसंस्थेच्या व्यवस्थापिका यांचेकडेच जात असून,संपूर्ण कारंजा शहरातील सहकार क्षेत्रात चर्चा रंगत आहेत. याचाच अर्थ पतसंस्थेच्या व्यवस्थापिका



म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची धुरा संभाळणाऱ्या सौ.आशाताई राऊत ह्याच विजयाच्या शिल्पकार ठरल्या आहेत. त्याबद्दल विविध क्षेत्रातील स्थानिक संस्थासह विदर्भ लोककलावंत संघटना, करंजमहात्म्य परिवार, मेघनभाऊ जुमळे मित्र मंडळाचे वतीने,सहकार क्षेत्रातील दिग्गज शेतकरी नेते गजाननराव अमदाबादकर, किरण पाटील सावके, संचालक मेघराज जुमळे,ज्येष्ठ पत्रकार संजय कडोळे,प्रा.पडघान इत्यादीनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी उपास्थीतांनी संचालकांच्या विजयाबद्दल सौ.आशाताई राऊत यांचे अभिनंदन करून, पतसंस्थेला पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. संजय कडोळे यांनी संस्थेच्या शाखा विस्ताराचे काम होऊन अमरावती विभागात संस्थेचा विस्तार करण्याची मागणी व्यक्त केली. या मागणीला सर्वांनी अनुमोधन देताच सौ.आशाताई राऊत यांनी त्या मागणीला प्रतिसाद दिला. व सर्वांचे आभार मानले.

## "20 दिवस उलटूनही दत्त हॉस्पिटल चौकशी समिती फाईलमध्येच!"

### "रुग्णांचे हक्क पायदळी प्रशासनाची उदासीनता"

**अनिल वेटे : दै. विश्वजगत**

यवतमाळ : महात्मा फुले जनआरोग्य योजनेत नोंदणी असूनही दत्त हॉस्पिटलने रुग्णांकडून तब्बल रु.२,४३,०००/- ची बेकायदेशीर वसुली केली. ही तक्रार अंकित नैताम, संयोजक, युवा टायगर फोर्स यांनी केली आहे.

समिती गठित — पण चौकशी थांबली. ११ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सकांनी चौकशी समिती गठित करण्याचे आदेश दिले. आज २० दिवस उलटून गेले, पण चौकशी सुरू झालेली नाही. समिती फक्त आदेशावर; प्रत्यक्ष पावले नाहीत. कायद्याचा भंग या योजनेत अतिरिक्त रक्कम घेणे गुन्हा.तक्रार दाखल झाल्यानंतर १५-३० दिवसांत चौकशी पूर्ण करणे बंधनकारक.प्रशासन मात्र उदासीन, रुग्णांचे हक्क पायदळी.गंभीर प्रश्न दोषींना संरक्षण दिले जातेय का? चौकशी लांबवण्यामागे दबाव आहे का?अधिकारी चौकशी रोखून बसलेत का?तक्रारदाराची ठाम मागणी चौकशी तात्काळ सुरू करावी दोषींवर कठोर कारवाई व्हावी चौकशीला अडथळा आणणाऱ्या अधिकारीविरोधात शिस्तभंगात्मक कारवाई करावी चौकशी अहवाल जनतेसमोर जाहीर करावा ठाम इशारा

"प्रशासनाच्या अनास्थेविरोधात रुग्णांचे हक्क, न्याय आणि पारदर्शकतेसाठी आमचा लढा सुरूच राहील!" अंकित नैताम संयोजक, युवा टायगर फोर्स

## श्री साई परमभक्त कै.म्हाळसापती यांची 103 वी पुण्यतिथी व गुरुवर्य मनोहर मार्तंड नागरे सर यांचे 6 पुण्यस्मरण

### श्री खंडोबाचे नि:स्सीम भक्त व पुजारी असलेले म्हाळसापती

**संजय महाजनः दै.विश्वजगत**

शिर्डी - श्री खंडोबाची नि:स्सीम भक्त व पुजारी असलेले म्हाळसापती यांनी आपले बहुतेक आयुष्य श्री खंडोबा मंदिर नों श्री साईबाबा यांच्यासोबत घालवले. म्हाळसापती यांच्या शिवाय साईलाही राहता आले नाही, कारण म्हाळसापतीच्या माध्यमातून बाबांची खरी ओळख साऱ्या जगाला झाली. आणि म्हाळसापतीद्वारा दिलेले "साई" हे नाव सहजतेने बाबांनी स्वीकारले. कोणतीही औपचारिकता नाही, पूर्वकल्पना नाही, फक्त म्हाळसापतीच्या तोंडून "साई" शब्द बाहेर पडले आणि लोक त्या फकीरला "साई" नावाने हाक मारू लागले. म्हालसापती, कांशीराम शिंपी आणि आप्पा जागले हे तिघे शिडीमध्ये संत, महात्मा, फकिर, मौलवी यायचे त्यांची सारी व्यवस्था करायचे, त्यांची सेवा करायचे, त्यांची सर्व व्यवस्था करायचे आणि त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करायचे. या गोष्टीवर ते लक्ष देत होते. अंदाजे १८५४ साली एके दिवशी दुपारी काही बैलगाड्या धूपखेडा हून (औरंगाबाद) निघाल्या आणि शिर्डीत दाखल झाल्या. चांद पटेल धुपखेडा गावचे पाटील, गावातील इतर लोक, आणि फकीरासारखा दिसणारा तेजपुंज सुंदरसा तरुणही त्या व्हाडा बरोबर होता म्हाळसापती यांच्या शेतात बैलगाड्या मुक्कामी होत्या, जिथे त्यांचे खळं होते, (खळं म्हणजे शेतातील पीक लावणी मळणी करण्याची जागा) सगळे लोक आपापल्या कामात व्यस्त होते, तो तेज पुंज तरुण एकटाच खंडोबाच्या मंदिराकडे चालायला लागला असे मानले जाते की खंडोबा स्वतःच त्यां फकिराला हाक मारतो जणू ते त्यांची वाट पाहत होते, जेव्हा तो तेजपुंज तरुण खंडोबा मंदिराकडे चालत येतो तेव्हा त्या सत्पुरुषाची व म्हाळसापतीची भेट होती यावेळी जणू काही सर्व ग्रह एकत्र येतात आणि त्यांना जोडतात. तो तेजस्वी तरुण पुढे सरकताच स्वतः म्हाळसापती स्वंय पूजेचे ताट घेऊन मंदिरातून बाहेर येतात. आणि समोर येऊन म्हणतात "!! या साई !! "त्या दिवसापासून बाबा साई हे नाव स्वीकारतात साईंसोबत रोज एकटे राहणाऱ्या भक्तांमध्ये म्हाळसापतोंचे नाव सर्वप्रथम येते. रोज रात्री साई म्हाळसापती आणि तात्या रात्री उशिरापर्यंत मशिदीत (द्वारकामाई) कुठल्या ना कुठल्या विषयावर भरपूर गप्पा मारत. मग तिघेही तिथेच झोपायचे. कधी-कधी रात्री झोपेतून उठल्यावर म्हाळसापतीना म्हणाले की बाबा वर, "मशिदीच्या छतावर जुन्या खुंट्यांनी टांगलेल्या लांबलचक लाकडी फळीवर बाबा झोपलेले दिसायचे, सात आठ फूट वर, बाबा कधी गेले ? ते कधी खाली आले?" त्याला कोणी खाली येताना पाहिले नव्हते आणि अगदी मनातल्या मनात म्हाळसापती यांनी बाबांना विचारले होते. पुढे बाबांनी ती फळी तोडून टाकली. 1886 साली मार्गशिर्ष पौर्णिमा च्या दिवशी बाबा तीन दिवस ब्रम्हाडी जाण्यापुर्वी म्हाळसापतीना बाबांनी बोलावून घेतले व बोलले माझ्या पार्थिव नश्वर देहाची काळजी घ्या मी त्यांना या विश्वात सोडत आहे. मी नक्कीच तीन दिवसांनी परत येईन, असे म्हाळसापती यांना बाबांनी सांगितलं त्यांच्या भक्तीवर बाबांना अपार विश्वास होता. म्हाळसापती यांच्या मांडीवर डोकं ठेवून बाबांनी श्वास सोडला दोन दिवस बाबांचा श्वास परत आला नाही, तेव्हा त्यांच्या मृत्यूची घोषणा झाली. तिसरा दिवस उजाडला तेव्हा गावात हिंदू-मुस्लिम धर्मगुरू तसेच बाबा विरोधी मंडळी मधील तणाव आणखी वाढला. बाबांचा अंत्यविधी करण्याचा अतोनात प्रयत्न झाला परंतु त्यावेळी म्हाळसापती च्या मागे खंबीर पणे हे महान साईभक्त तात्याबा रामचंद्रदादा, शामा, काशीराम शिंपी या सारखे बरेच साई भक्त उभे राहिले, काही मुस्लिमांनी व बाबा विरोधी मंडळी नी बाबांना जाळून अथवा दफन करण्याची पूर्ण व्यवस्था केली होती. पण म्हाळसापतौना पूर्ण विश्वास होता, की बाबांचा शब्द कधीच खोटा होत नाही जोपर्यंत कोपरगाव दरबाराचे (कोर्ट) अधिकारी येत नाहीत; तोपर्यंत मृतदेह कोणाच्याही ताब्यात दिला जाणार नाही असा पवित्रा सर्व भक्तांनी घेतला या वादातच तिसरा दिवस पूर्ण झाला नी बाबांनी डोळे उघडले आणि म्हाळसापतीकडे पाहून म्हणाले, " जात नाही, कोणीही दुनिया पासून दूर चालत"!. खऱ्या भक्तीचा परिचय देऊन म्हाळसापतीने साईबाबांचे मस्तक तथा डोकं तीन दिवस जमिनीवर ठेवले नाही. आणि ते कोणाच्याही हाती दिले नाही. त्याचा विश्वास जिंकला होता. बाबांच्या शब्दांचा विजय झाला होता. बाबांना जिवंत पाहून सर्व भक्तांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यानंतर जवळपास 32 वर्ष साई नों या शिर्डीच्या भूमीवर आपले कार्य केले. आजही भाविक प्रथम श्री खंडोबा च्या मंदिरात जाऊन दर्शन घेतात. व नंतर श्री साईबाबा च्या दर्शनाला जातात जसे प्रथम बाबा खंडोबाच्या दर्शनाला आले होते, तसेच




भाविकही सर्वप्रथम खंडोबाच्या मंदिरात येतात. म्हाळसापती फार वयोवृद्ध झाले होते. दृष्टीचें तेज ही मंद झाले होते वृद्धावस्थेमुळे ते चालू शकत नव्हते. पण मुलगा मार्तंडरावा च्या पाठीवर बसून मशीदीत दिवसातून एकदा तरी ते बाबांना भेटायला नक्की येत असत. श्री साईबाबा व श्री म्हाळसापती या दोघांमधील प्रेम सदैव जिवंत होते. ते दोघे ही पुराणकथा व इतर धार्मिक विषयांवर त्यांना चर्चा करायला नेहमीच आवडत होते. आणि त्यामुळे बाबा त्यांचे ऐकायचे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे श्री म्हाळसापती ही अशी एकमेव व्यक्ती होती जी बाबांच्या कपाळावर चंदनाचा टिळा लावत असत. बाकीचे भक्त ते फक्त मानेवर किंवा छातीवर लावू शकत होते. याचमुळे म्हाळसापती हे एकमेव श्रेष्ठ भक्त होते. श्री साईबाबांच्या आगमनापासून ते त्यांच्या समाधी पर्यंत संपूर्ण साई बाबांचा सहवास त्यांना लाभला अविरत बाबा आणि खंडोबाची सेवा करून भक्तांच्या मनावर उंच स्थान प्राप्त केले. आजही श्री म्हाळसापती हे नाव बाबांशी जोडले जाते. मरण्यापूर्वी त्यांना "मल्हारी महात्म्य एकायचे होते ते ऐकताच त्यांनी प्राणाची आहुती दिली., त्यांचे पुत्र मार्तंडराव यांनी मंदिरातील पूजा अर्चा करण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली. अशा महान श्री साई परमभक्त म्हाळसापती यांचे मंगळवार १२ सप्टेंबर १९२२ रोजी निधन झाले. अविरत बाबा आणि खंडोबाची सेवा करून भक्तांच्या मनावर उंच स्थान प्राप्त केले. आज त्यांची 103 वी पुण्यतिथी निमित्ताने हा लेख शब्दांकन - श्री म्हाळसापती यांचे पंतू संदिप मनोहर नागरे यांनी लिहिलेला आहे.